# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक १६/०७/२०१८**

**सभा सुचना क्रं. ०३ दु ११.३० वा.**

| अ क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. स्थायी समिती सभा दि.२०/०४/२०१८ रोजींचे इतिवृत्त कायम करणे. | ठराव :- दि. २०/०४/२०१८ रोजीचे मा. स्थायी समितीचे इतिवृत्त ही सभा एकमताने कायम करीत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २. | स्थायी समितीच्या सदस्यपदी असलेले १) श्री. उमेश द. नाईक २) श्री. सुदेश प्र. चौधरी ३) श्री. वृंदेश रघुनाथ पाटील ४) श्री. पंकज पदमाकर पाटील ५) श्री. अजित यशवंत नाईक ६) श्री. राजेंद्र राजाराम कांबळी ७) श्री. अफिफ जमिल शेख ८) श्री. स्वप्निल अविनाश बांदेकर हे आठ सदस्य निवृत्त होत असलेबाबत. | ठराव :- विद्यमान स्थायी समितीमध्ये १) श्री. उमेश द. नाईक २) श्री. सुदेश प्र. चौधरी ३) श्री. वृंदेश रघुनाथ पाटील ४) श्री. पंकज पदमाकर पाटील ५) श्री. अजित यशवंत नाईक ६) श्री. राजेंद्र राजाराम कांबळी ७) श्री. अफिफ जमिल शेख ८) श्री. स्वप्निल अविनाश बांदेकर हे सदस्य दिनांक ०१/०८/२०१८ रोजी दुपारी निवृत्त होत आहेत.सदर रिक्त होणाऱ्या या जागी नविन आठ सदस्यांची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत सादर करण्यात यावा. अशी ही सभा सर्वानुमत्ते ठरवित आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. उमेश नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ३. | वसई विरार शहर महानगरपालिका अग्निशमन व पाणी पुरवठा विभागाकरीता Submersible Pump / Mud Pump पुरवठा करणे कामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त विषयाबाबत सविस्तर चर्चा होऊन ठरविण्यांत आले की, अग्निशमन विभागाच्या आपत्कालीन व्यवस्थेसाठी सदर ५ पंप खरेदीस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत असुन या कामी ई - निविदा मागविण्यास मान्यता देण्यांत येत आहे. ई - निविदा मंजूरीच्या प्रस्तावात पंपाचा सविस्तर तांत्रिकतपशिल नमुद करण्यांत यावा. शहरातील सखल भागात साचणारे पाणी / गाळ काढण्यासाठी अजुन पंपाची आवश्यकता असल्यास ते हि प्रस्तावित करावे. तसेच पाणी पुरवठा विभागासाठी पंपाची आवश्यकता असल्यास त्यासाठी स्वतंत्र प्रस्ताव सादर करावा.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ४. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागातील रुग्णालये व माता बाल संगोपन केंद्रासाठी वार्डबॉय/आया/सफाई | ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागातील रुग्णालये व माता बाल संगोपन केंद्रासाठी वार्डबॉय/आया/सफाई कर्मचारी बाहय यंत्रणेद्वारे (Out Sourcing) ई निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मंजूर अभिकर्त्यास सुधारीत कार्यादेश देणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, रुग्णालये व माता बाल संगोपन |

| | | |
|---|---|---|
| | कर्मचारी बाहय यंत्रणेद्वारे (Out Sourcing) ई निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यत मंजूर अभिकर्त्यास सुधारीत कार्यादेश देणेबाबत. | केंद्रासाठी मंजूर ठेकेदारा मार्फत १४ आया व वॉर्ड बाय पूरविणेचे आदेश देण्यात आलेले होते. परंतू १४ वॉर्ड बॉय व आया यांचे कडून २ रुग्णालय व २ माता बाल संगोपन केंद्रांची साफसफाई करणे शक्य होत नसल्याने याकामी वैद्यकीय आरोग्य विभागातील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे रुग्णालये व माता बाल संगोपन केंद्र येथे प्रसुती विभाग, आय.सी.यू.विभाग, दंतचिकित्सक विभाग,शस्त्रक्रिया विभाग व इत्यादी विभाग कार्यरत असून. येथील अत्यावश्यक सेवा लक्षात घेता साफसफाई करणे कामी वॉर्ड बॉय व आया यांची आवश्यकता लक्षा घेता माहे मार्च २०१८ पासून ४३ वॉर्ड बॉय व आया मार्फत कामकाज करुन घेण्यात येत आहे. त्यामुळे सदर वॉर्ड बॉय व आया यांना माहे मार्च २०१८ पासून ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यत मंजूर ठेकेदारा मार्फत ४३ वॉर्ड बॉय व आया पुरविण्याकामी आदेश देऊन कर्मचाऱ्यांना पूर्वलक्षी प्रभावाने माहे मार्च २०१८ पासून वेतन देण्यात यावे. व जूचंद्र येथे नव्याने प्रस्तावित असलेले माता बाल संगोपन केंद्र दि.१५ ऑगस्ट २०१८ पासून सुरु करण्यांचा मानस असल्याने सदर ठिकाणी २० आया व वॉर्ड बाय पुरविणे बाबतचे आदेश मंजूर ठेकेदारा मार्फत देणे कामी ही सभा मंजुरी देत असून याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ५. | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील नागरीकांसाठी घरपट्टी व पाणीपट्टी कर भरणा करणेकामी Paytm ची सुविधा वापरणे बाबत. | ठराव :- सदर बाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली याकामी वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील नागरीकांसाठी घरपट्टी व पाणीपट्टी कर भरणा करणेकामी Paytm ची सुविधा सुरु करणे कामी ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. अजीत नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ६. | क्रीडा वित्त सहाय्य मिळणेकामी प्राप्त अर्जावर विचार विनिमय करुन आर्थिक अनुदान मंजुर करणेबाबत. | ठराव :- वरील प्रस्तावावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली त्यानुसार मा. सर्वसाधारण ठराव क्र.०५ दिनांक १४/०७/२०१७ च्या सर्वसाधारण नियमावलीतील अटी व शर्ती नुसार वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त व स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या परंतु कोणतेही पदक मिळवू न शकलेल्या स्पर्धकाला प्रोत्साहन पर अनुदान, असे प्रस्तावातील वित्त सहाय्य मागणी अर्ज क्र.०१ ते अर्ज क्र.३७ अशा एकूण ३७ खेळाडूंना रोख बक्षिस देऊन गौरविण्याच्या योजनेची मंजूर नियमावलीच्या अनुषंगाने वित्तसहाय्य देणेकामी ही सभा मंजुरी देत आहे. व त्याकामी होणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वैभव पाटील सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ७. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती अे बोळींज अंतर्गत आगाशी हद्दीतील | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. सन २०१८/१९ ते सन २०२०/२१ या तीन वर्षासाठी प्रती वर्षी १०% वाढ करुन रक्कम रु. ८,४६,८४२/- (आठ लाख सेहेचाळीस हजार आठशे बेचाळीस रुपये मात्र) या अपेक्षित रक्कमेवर |

| | | |
|---|---|---|
| | बाजारकर सन २०१८-२०२१ या वित्तीय वर्षाकरीता वार्षिक ठेका पध्दतीने वसुलीस देणेबाबत. | १२% GST लावण्यास व वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करुन निविदा मागविण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सखाराम महाडिक सूचक :- मा.श्री. वैभव पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ८. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी अंतर्गत येणाऱ्या गोखिवरे विभागात भरणारा दैनंदिन बाजार शुल्क वसुलीचा सन २०१८-२०१९ या वर्षाच्या वार्षिक ठेक्यास (ई-निविदा) प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणेबाबत. | ठराव :- सदर बाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन प्रभाग समिती जी अंतर्गत गोखिवरे विभागात भरणारा दैनंदीन बाजार मंजुर ठेका सन २०१७/१८ या वित्तिय वर्षातील बाजार शुल्क ठेक्यात रक्कम ३३,३९,९३०/- (अक्षरी रुपये तेहत्तीस लाख एकोणचाळीस हजार नऊशे तीस रुपये मात्र) तसेच सदर रक्कमेवर १०% वाढ करुन रक्कम रु.३,३३,९९३/- मात्र गृहीत धरुन सन २०१८/१९ साठी किमान रक्कम रु. ३६,७३,९२३/- (अक्षरी रुपये छत्तीस लाख त्र्याहत्तर हजार नऊशे तेविस मात्र) अपेक्षित रक्कम धरुन मागील मंजुर निविदा धारक यांचेकडून प्राप्त झालेली रक्कम वजा करुन उर्वरीत कालावधी व उर्वरीत रक्कमेकरीता ई-निविदा पध्दतीने निविदा काढण्याबाबत वर्तमान पत्रात जाहिर निविदा प्रसिध्दी करण्यास ही सभा प्रशासकीय व त्या अंनुषगीक खर्चास वित्तिय मान्यता देत आहे. अटी व शर्तीमध्ये मंजूर निविदा धारकाचे प्राप्त होणाऱ्या ई-निविदा रक्कमेवर शासकीय दराने नियमानुसार वस्तू सेवाकर (G.S.T) कर घेणे आवश्यक आहे. तसेच सदर बाजार निविदेचा सन २०१८/१९चा नविन कार्यादेश निघेपर्यंत दि.०१/०४/२०१८ पासून पूर्वलक्षी प्रभावाने ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मागील मंजुर निविदा धारकास १०% वाढीव दराप्रमाणे बाजार ठेका वसुली करण्यास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ९. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती डी मधील नालासोपारा पूर्व येथील डॉन लेन येथे आचोळे मेन रोड ते गाला नगर मेन रोड पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | ठराव :- वरील प्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्री. किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १०. | प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील प्रभाग क्र.०५ मधील कोपर स्वाध्याय मंदीर ते कशीद गांव पर्यंत रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण करणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत कामाला प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक बाधक चर्चा करण्यात आली त्यानुसार सदर काम करणेस व सदर कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम रु.२६,७३७०५/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे सदर कामी विहीत प्रणालीनुसार निविदा मागविणेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.विद्या पाटील सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| ११. | प्रभाग समिती ड वॉर्ड क्र.६० मध्ये फादरवाडी प्रगती कॉम्प्लेक्स येथे पाईप बांधणे, जुन्या गटारावर स्लॅब व फुटपाथ बांधणे कामी शुन्य रक्कमेचे अंतीम देयक प्रदान करणेबाबत. | ठराव :- उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. मंजूर असलेल्या सदर कामी पैकी प्रत्यक्षात किती काम पुर्ण केले असून किती काम प्रत्यक्षात शिल्लक आहे याबाबतचा तांत्रिक अहवालासह काम रद्द करणेबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे सादर करावा अशी स्थायी समिती ठरवित आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. कन्हैय्या भोईर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १२. | अग्निशमन विभागातील कर्मचारी ग्रुप विमा हप्ता रक्कम भरणे कामी केलेल्या कार्यवाहीस मंजुरी बाबत. | ठराव :- अग्निशमन विभागातील कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना आग विझवताना इजा दुखापत अथवा दुर्देवी प्रसंग ओढविल्यास अपंगत्व अथवा मृत्यु आल्यास जवानांचे कुटूंब उघटयावर पडू नये व त्यांच्या वारसाला सुरक्षा विमा कवच मिळावे या करिता अग्निशमन विभागाचे कर्मचाऱ्यांचा ग्रुप विमा काढणे कामी व विमा हप्ता रक्कम रु ७,९५,६१०/- भरणा करणे कामी केलेल्या कार्यवाहीस हि सभा मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. वैभव पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १३. | वसई -विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) वॉर्ड क्र.५२ मधील जाधव रेसीडेन्सी ते शांती चाळ पर्यंत सी.सी. गटार बांधणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१७० दि.२८/०४/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे तसेच मे.राज एंटरप्रायजेस यांचे ०.२५% जादा हे प्राप्त झालेल्या निविदेतील दर महानगरपालिकेस जास्त वाटत असल्याने दर कमी करणेबाबत चर्चा करणेसाठी संबंधीत ठेकेदारास दि.१५/०१/२०१८ च्या पत्रान्वये कळविले होते तद्अनुषंगाने सदर काम अंदाजपत्रकीय दराने करणेस तयार असलेबाबत मे. राज एंटरप्रायजेस यांनी दि.१६/०१/२०१८ च्या पत्रान्वये या कार्यालयास कळविलेनुसार सकारात्मक दृष्टया मे.राज एंटरप्रायजेस यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा लघुत्तम दराची असल्याने महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्तांच्या शिफारशीनुसार संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्री. कन्हैय्या भोईर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १४. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) वॉर्ड क्र.३७ मधील समर्थ बंगला ते ९० फूट डी.पी. नालासोपारा - विरार लिंक रोड (नवीन उघडी) पर्यतच्या रस्त्यास दुभाजक बसविणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. १६५ दि. २८/०४/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे.सुनिल एच.राठोड यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (-) ८.०१% कमी दराने निविदा लघुत्तम आहे. सदर विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करणेंत आली. सन्मा.स्थायी समिती सदस्यांनी सदरचा रस्ता सद्यस्थितीत रहदारीचा असल्याने भविष्यात आवश्यकतेनुसार उपरोक्त दुभाजकाचे काम घेण्यास सुचविले व सद्यास्थितीत उपरोक्त काम रद्द करावे असे सुचित केले. त्यानुसार सदरचा विषय सभागृहाने एकमताने रद्द करणेंस मंजूरी दिली.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.विद्या पाटील सूचक :- मा.श्री. किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| १५. | प्रभाग समिती - एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील प्रभाग क्र.४४ मधील वालईपाडा गरेल कंपाऊंड येथे तिरुपती बालाची नगर ते जोया हॉस्पीटल पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर प्रकरणी साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. अंतत: संदर्भिय विषयाबाबत पुर्न प्रस्ताव सभेत सादर करावा यास सभेने एकमताने मंजूरी दिली.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत    सूचक :- मा.श्री. कन्हैय्या भोईर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १६. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती बी कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू.) वॉर्ड क्र.५४ मधील ओसवाल नगरी जवळ मुख्य रस्त्यास रजनी अपा. जवळ आर.सी.सी. बॉक्स कल्व्हर्ट बांधणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. ३३ दि. २८/०४/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे.आर.एस. एंटरप्रायजेस यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (-) १०.००% कमी दराने निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधि नियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्तांच्या शिफारशीनुसार संविदा करणेंस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस    सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १७. | सन २०१६-१७, सन२०१७-१८ व सन २०१८-१९ या वित्तीय वार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात प्रिकास्ट आर.सी.सी. झाकणे पुरविणे व बसविणे. (बी-२ निविदा) या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करणेबाबत. | ठराव :- सदरबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेंत आली. मे. अनायडा एंटरप्रायजेस यांच्या निम्नतम निविदा दरास मान्यता देणेंत येत असून त्यांचेबरोबर संविदा करणेंस ही सभा वित्तीय मंजूरी देत आहे. तसेच मेसर्स ओमकार एंटरप्रायजेस व नितेश मलवानी यांनी निविदा स्पर्धेमध्ये भाग घेतला नसल्याने त्यांना पॅनलवर समाविष्ट करण्यांत येऊ नये. यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अजीत नाईक    सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १८. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती डी येथील दिप आंगन ते शनी मंदिर पर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुरीबाबत. | ठराव :- सदर कामास मा. स्थायी समिती सभा ठराव क्र.११५ दि २८/०४/२०१५ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मक दृष्टया मे.हमिद जे शेख यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दराची निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये हया कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा. आयुक्त हयांची मा.स्थायी समिती कडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा. स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मान्यता देण्याता येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अजीत नाईक    सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| १९. | सन २०१८-१९ हया वित्तीय वार्षिक वर्षाकरीता प्रभाग समिती D मध्ये पावसाळ्यापूर्वी नालेखोदाईसाठी व गटारातील गाळ काढण्यासाठी जे.सी.बी., पोकलेन व इतर यंत्रसामुग्री भाडेतत्वावर पुरविणे. (बी-२ निविदा दर ) या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- (प्रभाग समिती D करीता) सदर कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. १२ दि. १६/०३/२०१८ अन्वये आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा केली असता प्राप्त निविदांपैकी करुन सकारात्मक दृष्ट्या मे.अेस एंटरप्रायजेस ह्यांची निविदा (वाटाघाटीने) लघुत्तम आहे. सदर निम्नत्तम निविदा दर कार्योत्तर मंजूरीसाठी सादर करणेत आले आहे. सदर प्रभागामध्ये मे.अेस एंटरप्रायजेस ह्यांचे मार्फत खोदण्यात/सफाई करण्यात आलेले नाले व त्यातून काढण्यात आलेला गाळ कुठल्या ठिकाणी डंम्प करण्यात आला? सदर नाले सफाई करीता प्रभाग निहाय खर्च किती? तसेच नाले सफाई करीता एकुण वापरण्यात आलेल्या मशीनरी/कालावधी वैगरे बाबतचा अहवाल तयार करुन मा.स्थायी समिती सभेपुढे सादर करण्यात यावा असे हि सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. सुदेश चौधरी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २०. | सन २०१८-१९ हया वित्तीय वार्षिक वर्षाकरीता प्रभाग समिती A,B,C,E,F,G,H,I, मध्ये पावसाळ्यापूर्वी नालेखोदाईसाठी व गटारातील गाळ काढण्यासाठी जे.सी.बी., पोकलेन व इतर यंत्रसामुग्री भाडेतत्वावर पुरविणे. (बी-२ निविदा दर ) या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत. | प्रस्तावाचा निर्णय :- (प्रभाग समिती A करीता)<br>सदर कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. १२ दि. १६/०३/२०१८ अन्वये आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा केली असता प्राप्त निविदांपैकी करुन सकारात्मक दृष्ट्या मे.बाबा कंन्स्ट्रक्शन ह्यांची निविदा (वाटाघाटीने) लघुत्तम आहे. सदर निम्नत्तम निविदा दर कार्योत्तर मंजूरीसाठी सादर करणेत आले आहे. सदर प्रभागामध्ये मे.बाबा कंन्स्ट्रक्शन ह्यांचे मार्फत खोदण्यात/सफाई करण्यात आलेले नाले व त्यातून काढण्यात आलेला गाळ कुठल्या ठिकाणी डंम्प करण्यात आला? सदर नाले सफाई करीता प्रभाग निहाय खर्च किती? तसेच नाले सफाई करीता एकुण वापरण्यात आलेल्या मशीनरी/कालावधी वैगरे बाबतचा अहवाल तयार करुन मा.स्थायी समिती सभेपुढे सादर करण्यात यावा असे हि सभा ठरवित आहे.<br>(प्रभाग समिती B करीता) सदर कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. १२ दि. १६/०३/२०१८ अन्वये आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा केली असता प्राप्त निविदांपैकी करुन सकारात्मक दृष्ट्या मे.बाबा कंन्स्ट्रक्शन ह्यांची निविदा (वाटाघाटीने) लघुत्तम आहे. सदर निम्नत्तम निविदा दर कार्योत्तर मंजूरीसाठी सादर करणेत आले आहे. सदर प्रभागामध्ये मे.बाबा कंन्स्ट्रक्शन ह्यांचे मार्फत खोदण्यात/सफाई करण्यात आलेले नाले व त्यातून काढण्यात आलेला गाळ कुठल्या ठिकाणी डंम्प करण्यात आला? सदर नाले सफाई करीता प्रभाग निहाय खर्च किती? तसेच नाले सफाई करीता एकुण वापरण्यात आलेल्या |

मशीनरी/कालावधी वैगरे बाबतचा अहवाल तयार करुन मा.स्थायी समिती सभेपुढे सादर करण्यात यावा असे हि सभा ठरविते आहे.

**(प्रभाग समिती C करीता)** सदर कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. १२ दि. १६/०३/२०१८ अन्वये आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा केली असता प्राप्त निविदांपैकी करुन सकारात्मक दृष्ट्या मे.त्रिमुर्ती एंटरप्रायजेस ह्यांची निविदा (वाटाघाटीने) लघुत्तम आहे. सदर निम्नत्तम निविदा दर कार्योत्तर मंजूरीसाठी सादर करणेत आले आहे. सदर प्रभागामध्ये मे.त्रिमुर्ती एंटरप्रायजेस ह्यांचे मार्फत खोदण्यात/सफाई करण्यात आलेले नाले व त्यातून काढण्यात आलेला गाळ कुठल्या ठिकाणी डंम्प करण्यात आला? सदर नाले सफाई करीता प्रभाग निहाय खर्च किती? तसेच नाले सफाई करीता एकुण वापरण्यात आलेल्या मशीनरी/कालावधी वैगरे बाबतचा अहवाल तयार करुन मा.स्थायी समिती सभेपुढे सादर करण्यात यावा असे हि सभा ठरविते आहे.

**(प्रभाग समिती E करीता)** सदर कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. १२ दि. १६/०३/२०१८ अन्वये आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा केली असता प्राप्त निविदांपैकी करुन सकारात्मक दृष्ट्या मे.वसुंधरा अर्थमुवर्स प्रा.लि. ह्यांची निविदा (वाटाघाटीने) लघुत्तम आहे. सदर निम्नत्तम निविदा दर कार्योत्तर मंजूरीसाठी सादर करणेत आले आहे. सदर प्रभागामध्ये मे.वसुंधरा अर्थमुवर्स प्रा.लि. ह्यांचे मार्फत खोदण्यात/सफाई करण्यात आलेले नाले व त्यातून काढण्यात आलेला गाळ कुठल्या ठिकाणी डंम्प करण्यात आला? सदर नाले सफाई करीता प्रभाग निहाय खर्च किती? तसेच नाले सफाई करीता एकुण वापरण्यात आलेल्या मशीनरी/कालावधी वैगरे बाबतचा अहवाल तयार करुन मा.स्थायी समिती सभेपुढे सादर करण्यात यावा असे हि सभा ठरविते आहे.

**(प्रभाग समिती F करीता)** सदर कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. १२ दि. १६/०३/२०१८ अन्वये आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा केली असता प्राप्त निविदांपैकी करुन सकारात्मक दृष्ट्या मे.स्टार ग्रुप इस्टेट कंन्सल्टंट ह्यांची निविदा (वाटाघाटीने) लघुत्तम आहे. सदर निम्नत्तम निविदा दर कार्योत्तर मंजूरीसाठी सादर करणेत आले आहे. सदर प्रभागामध्ये मे.स्टार ग्रुप इस्टेट कंन्सल्टंट ह्यांचे मार्फत खोदण्यात/सफाई करण्यात आलेले नाले व त्यातून काढण्यात आलेला गाळ कुठल्या ठिकाणी डंम्प करण्यात आला? सदर नाले सफाई करीता प्रभाग निहाय खर्च किती? तसेच नाले सफाई करीता एकुण वापरण्यात आलेल्या मशीनरी/कालावधी वैगरे बाबतचा अहवाल तयार करुन मा.स्थायी समिती सभेपुढे सादर करण्यात यावा असे हि सभा ठरविते आहे.

**(प्रभाग समिती G करीता)**

प्राप्त निविदांपैकी करुन सकारात्मक दृष्ट्या मे.श्री साई गणेश कन्स्ट्रक्शन ह्यांची निविदा (वाटाघाटीने) लघुत्तम आहे. सदर निम्नत्तम निविदा दर कार्योत्तर

| | | |
|---|---|---|
| | | मंजूरीसाठी सादर करणेत आले आहे. सदर प्रभागामध्ये **मे.श्री साई गणेश कन्स्ट्रक्शन** ह्यांचे मार्फत खोदण्यात/सफाई करण्यात आलेले नाले व त्यातून काढण्यात आलेला गाळ कुठल्या ठिकाणी डंम्प करण्यात आला? सदर नाले सफाई करीता प्रभाग निहाय खर्च किती? तसेच नाले सफाई करीता एकुण वापरण्यात आलेल्या मशीनरी/कालावधी वैगरे बाबतचा अहवाल तयार करुन मा.स्थायी समिती सभेपुढे सादर करण्यात यावा असे हि सभा ठरविते आहे.<br><br>(प्रभाग समिती H करीता)<br>सदर कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. १२ दि. १६/०३/२०१८ अन्वये आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा केली असता प्राप्त निविदांपैकी करुन सकारात्मक दृष्ट्या **मे.श्री साई गणेश कन्स्ट्रक्शन** ह्यांची निविदा **(वाटाघाटीने)** लघुत्तम आहे. सदर निम्नत्तम निविदा दर कार्योत्तर मंजूरीसाठी सादर करणेत आले आहे. सदर प्रभागामध्ये **मे.श्री साई गणेश कन्स्ट्रक्शन** ह्यांचे मार्फत खोदण्यात/सफाई करण्यात आलेले नाले व त्यातून काढण्यात आलेला गाळ कुठल्या ठिकाणी डंम्प करण्यात आला? सदर नाले सफाई करीता प्रभाग निहाय खर्च किती? तसेच नाले सफाई करीता एकुण वापरण्यात आलेल्या मशीनरी/कालावधी वैगरे बाबतचा अहवाल तयार करुन मा.स्थायी समिती सभेपुढे सादर करण्यात यावा असे हि सभा ठरविते आहे.<br><br>प्रभाग समिती I करीता)<br>सदर कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. १२ दि. १६/०३/२०१८ अन्वये आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा केली असता प्राप्त निविदांपैकी करुन सकारात्मक दृष्ट्या **मे.श्री साई गणेश कन्स्ट्रक्शन** ह्यांची निविदा **(वाटाघाटीने)** लघुत्तम आहे. सदर निम्नत्तम निविदा दर कार्योत्तर मंजूरीसाठी सादर करणेत आले आहे. सदर प्रभागामध्ये **मे.श्री साई गणेश कन्स्ट्रक्शन** ह्यांचे मार्फत खोदण्यात/सफाई करण्यात आलेले नाले व त्यातून काढण्यात आलेला गाळ कुठल्या ठिकाणी डंम्प करण्यात आला? सदर नाले सफाई करीता प्रभाग निहाय खर्च किती? तसेच नाले सफाई करीता एकुण वापरण्यात आलेल्या मशीनरी/कालावधी वैगरे बाबतचा अहवाल तयार करुन मा.स्थायी समिती सभेपुढे सादर करण्यात यावा असे हि सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. सुदेश चौधरी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २१. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती डी आचोळे क्षेत्रातील नवघर पूर्व येथे औद्योगिक | ठराव :- सदर कामास मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र.८ दि १८/०९/२०१७ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मक दृष्टया मे.हमिद जे शेख यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दराची निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये हया कमी दराच्या निविदेस संविदा करणेस |

| | | |
|---|---|---|
| | वसाहतीमध्ये अग्निशमन केंद्राची इमारत बांधणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुरीबाबत. | मान्यता देण्याकरीता मा. आयुक्त हयांची मा.स्थायी समिती कडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा. स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मान्यता देण्याता येत आहे.<br><br>**अनुमोदक :- मा.श्री.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. अजीत नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २२. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) वॉर्ड क्र. ५०मधील मौर्या यांचे दुकानापासून ते विरार मुख्य रस्त्यापर्यंत रस्त्यालगत आर.सी.सी. गटार बांधणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर कामास मा. स्थायी समिती सभा ठराव क्र.३१ दि २८/०४/२०१७ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच मे. मॅगॉक्सी इन्फ्रा. प्रा.लि. यांचे ३.७ % जादा हे प्राप्त झालेल्या निविदेतील दर महानगरपालिकेस जास्त वाटत असल्याने दर कमी करणेबाबत चर्चा करणेसाठी संबंधीत ठेकेदारास दि.०८/०२/२०१८ च्या पत्रान्वये कळविले होते. तद्अनुषंगाने सदर काम अंदाजपत्रकीय दराने करणे तयार असलेबाबत मे. मॅगॉक्सी इन्फ्रा.प्रा.लि. यांनी दि.०९/०२/२०१८ च्या पत्रान्वये या कार्यालयास कळविलेनुसार सकारात्मक दृष्टया मे.मॅगॉक्सी इन्फ्रा.प्रा.लि. यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा लघुत्तम दराची असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा. आयुक्तांच्या शिफारशीनुसार संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २३. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यक्षेत्रातील नालासोपारा वॉर्ड क्र.३९ मधील मातेश्वरी ते ईशकृपा अपा. रेल्वे नाल्यापर्यंत खडीकरण व डांबरीकरण करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१६६ दि. २८/०४/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मक दृष्टया मे.आदित्य एंटरप्रायजेस यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (-) ७.१०% कमी दराने निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समिती कडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा. स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा. आयुक्तांच्या शिफ ारशीनुसार संविदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. उमेश नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २४. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, दवाखाने व वैद्यकीय आरोग्य विभाग यासाठी तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत समुपदेष्टआ व समाजसेवक वर्गास मुदतवाढ | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, दवाखाने व वैद्यकीय आरोग्य विभाग यासाठी तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत समुपदेष्टा व समाजसेवक वर्गास मुदवाढ देणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३(३) या मा. आयुक्त यांना असलेल्या अधिकारा अंतर्गत तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्यांच्या कालावधी साठी कंत्राटी पध्दतीने समुपदेष्टा व समाजसेवक वर्ग नियुक्त केलेल्या समुपदेष्टा व समाजसेवक यांच्या सेवा कालावधी दि.१५ एप्रिल २०१८ रोजी संपुष्टात आलेला आहे. तथापि ६ महिन्यांच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने समुपदेष्टा व समाजसेवक यांची पदे लोकसभेची |

| | | |
|---|---|---|
| | देणेबाबत. | पोट निवडणूक, कोकण पदवीधर मतदार संघाची निवडणूक यांच्या आचारसंहितेमुळे भरणे/ नियुक्ती करणे शक्य झाले नाही. सबब वैद्यकीय आरोग्य विभागातील समुपदेष्टा (Counsellor) ०४ पदे व २ समाज सेवक अशी ६ पदांची आवश्यकता तसेच आरोग्य सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याकारणाने सदर समुपदेष्टा व समाजसेवक वर्गास एक दिवसांचा तांत्रिक खंड देवून माहे ऑगस्ट २०१८ पासून पुढील ६ महिन्याच्या कालावधी करीता कलम ५३(३) नुसार स्थायी समितीच्या पुर्व मंजूरीने सदर नेमणूका ६ महिन्यांच्या कंत्राटी पध्दतीने पुढे चालू ठेवणेस हरकत नसून ही सभा मंजुरी देत असून याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सखाराम महाडिक सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २५. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालयातील गरजू रुग्णांना माफक दरात रक्त पुरवठा केलेल्या देयकाची रक्कम आदा करणेकामी कायोत्तर मंजूरी तसेच "रक्त व रक्तघटक पुरविणे" बाबत ई-निविदा प्रक्रिया करणेकामी प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालयातील गरजू रुग्णांना माफक दरात रक्त पुरवठा केलेल्या देयकाची रक्कम अदा करणेकामी कायोत्तर मंजूरी तसेच "रक्त व रक्तघटक पुरविणे" बाबत ई-निविदा प्रक्रिया करणेकामी प्रशासकिय व वित्तिय मंजूरी मिळणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, सन २०१७-१८ या वर्षामध्ये वसई विरार शहर महानगरपालिका संचालित रुग्णालये व माताबाल संगोपन केंद्रे येथिल गरजू रुग्णांना विजयी ब्लड बँकेमार्फत मोफत रक्त व रक्त घटक पुरवठा केल्याकामी एकूण देयकाची रक्कम रु.३७,४५,८००/- (अक्षरी - सदोतीस लाख पंचेचाळीस हजार आठशे रु.मात्र) इतकी होत असून सदर देयकांपैकी मे. चेअरमन, विजयी ब्लड बँक यांना रक्कम रु.१२,५९,१००/- अदा केले असुन रु.२४,८६,७००/- चे देयक प्रलंबीत आहेत. तरी एकुण रु.३७,४५,८००/- इतक्या रक्कमेस कार्योत्तर मंजुरी तसेच वसई विरार शहर महानगरपालिकेतील संचालित रुग्णालयांतील रुग्णांना "रक्त व रक्तघटक पुरविणे" या बाबींची आवश्यकता लक्षात घेता पुढील कालावधीकरिता सदर विषयाबाबतची ई-निविदा प्रक्रिया करणेस व सदरची निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत रक्त व रक्त घटक पुरविणे हि सेवा सद्या उपलब्ध करुन देत असलेल्या संस्थेकडूनच (मे.विजयी ब्लड बँक, वसई) उपलब्ध करुन घेणेस ही सभा मंजुरी देत असुन याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २६. | प्रभाग समिती एफ (जुना ब) धानिव/पेल्हार क्षेत्रातील रामहर्षल बिल्डींग ते जयभवानी चाळ पर्यंत सी.सी.पाथवे करणे कामी या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त निविदांची तूलना करता मे. तिर्थराज कंन्स्ट्रक्शन हयांची निविदा अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये हया कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देणेकरीता मा.आयुक्त हयांनी मा. स्थायी समिती कडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार संविदा करणेस हि सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २७. | प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील प्रभाग क्र. ४६ मधील पाच आंबा येथील पवन अपार्टमेंट ते तुळींज रोड पर्यंत रस्त्याच्या | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती क्र.२३४ दि.०२/०५/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्टया मे. एस.एम.डेव्हलपर्स हयांची ७.५१% कमी दराची निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता |

| | | |
|---|---|---|
| | साईडपट्टीचे खडीकरण डांबरीकरण करणे कामी या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | देण्याकरीता मा.आयुक्त हयांची मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) मा.आयुक्तांच्या शिफारशी नुसार संविदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २८. | प्रभाग समिती एफ धानिव /पेल्हार क्षेत्रातील पाच आंबा मुख्य रस्त्यावर पवन अपा. ते औदुंबर निवास पर्यंत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे कामी या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती क्र.२३३ दि.०२/०५/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्टया मे. ओम साई कंन्स्ट्रक्शन हयांची अंदाजपत्रकीय दराची निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त हयांची मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) मा.आयुक्तांच्या शिफारशी नुसार संविदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २९. | प्रभाग समिती एफ धानिव /पेल्हार (जुना ब) क्षेत्रातील प्रभाग क्र.४२ मध्ये गांगडेपाडा मस्जिद जवळ पांढरेपाडा येथे रस्ता खडीकरण करणे कामी या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती क्र.२८५ दि.२३/०७/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्टया मे. एस.एम.डेव्हलपर्स हयांची ४.२८% कमी दराची निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त हयांची मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) मा.आयुक्तांच्या शिफारशी नुसार संविदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ३०. | प्रभाग समिती एफ धानिव /पेल्हार क्षेत्रातील वॉर्ड क्र.४२ मध्ये जाधवपाडा येथे परशुराम झाटे कंपाऊंड ते पलाटपाडा ते रामधनी नगर येथे रस्ता खडीकरण करणे कामी या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती क्र.२८७ दि.२३/०६/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्टया मे. एस.एम.डेव्हलपर्स हयांची ४.५१% कमी दराची निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त हयांची मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) मा.आयुक्तांच्या शिफारशी नुसार संविदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| ३१. | वसई विरार शहर महानगरपालिका आयोजित शालेय जिल्हा क्रीडा स्पर्धा २०१८ चे आयोजनाबाबत. | ठराव :- वरील विषयांवर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिका मार्फत सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात आंतर शालेय जिल्हा क्रीडा स्पर्धाचे आयोजन करणेकामी व त्याकी येणाऱ्या एकूण रु.२५ लक्ष इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.आंतर शालेय जिल्हा क्रीडा स्पर्धेचे आयोजन करणे कामी प्रस्तावात नमुद बाबीचे व त्याअंनुषगिक बाबीचे वार्षिक दर मंजुर असल्यास वार्षिक मंजुर निविदाकार यांना कामाचे कार्यादेश देऊन कामे करुन घेण्यांसाठी याचबरोबर जया बांबीकरिता वार्षिक दर मंजूर नाहीत अशा बाबीकरिता दरपत्रके ईनिविदा मागविणेंस ही सभा सर्वानुमत्ते आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.आंतर शालेय जिल्हा क्रीडा स्पर्धेचे आयोजन करणेकामी मंजुर नसलेल्या बाबी करीता प्रशासनाने ई-निविदा व दरपत्रंकाची कार्यवाही प्रभाग समिती सी कार्यालयाकडून करणेकामी ही सभा सर्वानुमत्ते आर्थीक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सखाराम महाडिक सूचक :- मा.श्री. उमेश नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ३२. | केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील अतिरीक्त पाणीपुरवठा वितरण व्यवस्था योजनेमुळे बाधित होणाऱ्या रस्त्याची पुर्नबांधणी करणेकामी लघुत्तम निविदा दरास मान्यता देणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली असता मे. एन.ए.कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ३.४९% जास्त दराने निविदेस मान्यता देण्यांत येत असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार कामाची संविदा करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच निविदेमध्ये भाग घेतलेल्या इतर ४ निविदाधारकांनी निम्मतम दराने काम करण्यास अनुमती दर्शविल्याने त्यांची पॅनलवर नियुक्ती करण्यासाठी ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्री. उमेश नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ३३. | सन २०१७/१८,२०१८/१९ व २०१९/२० या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिका पाणीपुरवठा उसगांव/शिरवली उद्भव २० द.ल.ली. व पापडखिंड १ द.ल.ली क्षमता योजनेतील सब स्टेशन, इलेक्ट्रीक पॅनल, पंपीग मशिनरी व जलशुध्दीकरण केंद्रामधील यांत्रिकी बाबीची देखभाल दुरूस्ती करणे कामी संविदा करणेबाबत. | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली असून पापडखिंड १ द.ल.ली.क्षमता योजनेचे काम व नाव या विषयातुन वगळण्यात येऊन उसगाव/शिरवली उद्भव २० द.ल.ली क्षमता योजनेतील सब स्टेशन, इलेक्ट्रीक पॅनल पपींग मशिनरी व जलशुध्दीकरण केंद्रामधील यांत्रिकी बाबींची देखभाल दुरुस्ती करणे कामाकरीता मे.ए.आर.एंटरप्रायजेस यांस समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार कामाची संविदा करण्यास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच सन २०१७-१८ हे वित्तीय वर्ष समाप्त झाल्याने सदर कामाची मुदत ही सन २०१८-१९, २०१९-२० या कालावधी पर्यंत राहिल यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. महेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ३४. | सन २०१८/१९, २०१९/२० व २०२०/२१ या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिका पाणीपुरवठा योजनेच्या | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमूद कामास अंदाजीत रक्कम रु. १५,००,०००/- रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे व पुढील निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. उमेश नाईक |

| | | |
|---|---|---|
| | जलशुध्दीकरण केंद्रामधील क्लोरीनेशन यंत्रणेची देखभाल दुरूस्ती करणे कामी प्रशासकीय वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव सर्वानुमते मंजूर |
| ३५. | सुर्या पाणीपुरवठा योजना (टप्पा- १ व २) आणि उसगांव पाणीपुरवठा योजनेच्या मुख्य जलवाहिन्यांचे Structural & Hydraulic Audit करून घेणेकामी IIT, Mumbai यांची नेमणूक करण्यास सेवा शुल्काच्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यास व पुढील कार्यवाही करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. उमेश नाईक<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ३६. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्रे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, दवाखाने, वैद्यकिय आरोग्य विभाग, आय.सी.यु. व डायलिसीस सेंटर यासाठी तात्पुरता स्वरुपात ६ महिन्याच्या कालवधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत अधिकारी यांना मुदतवाढ मिळणेबाबत. | ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, माता बाल संगोपन केंद्रे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, दवाखाने, वैद्यकीय आरोग्य विभाग, आय.सी.यू. व डायलेसीस सेंटर यासाठी तात्पुरत्या स्वरुपात ६महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत अधिकारी/कर्मचारी वर्गास मुदतवाढ देणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३(३) या मा. आयुक्त यांना असलेल्या अधिकारा अंतर्गत तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्यांच्या कालावधी साठी कंत्राटी पध्दतीने अधिकारी/कर्मचारी वर्ग नियुक्त केलेल्या वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा कालावधी दि.०६/०६/२०१८ रोजी संपुष्टात आलेला आहे. तथापि ६ महिन्यांच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांची पदे लोकसभेची पोट निवडणूक, कोकण पदवीधर मतदार संघाची निवडणूक यांच्या आचारसंहितेमुळे भरणे/ नियुक्ती करणे शक्य झाले नाही. सदर वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गाचा सेवा कालावधी ६ जून २०१८ रोजी समाप्त झाल्याने सर्व वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गाने दि.०७/०६/२०१८ रोजी मा. आयुक्त यांना निवेदन देवून वैद्यकीय आरोग्य विभागाची अत्यावश्यक सेवा ठप्प होऊन नये म्हणून पुढील आदेश होई पर्यत १ दिवसांचा तांत्रिक खंड घेवून दि.०८/०६/२०१८ रोजी पासून सर्व रुग्णालये, माता बाल संगोपन केंद्र, ना.प्रा.आ.केंद्र, दवाखाने व वैद्यकीय आरोग्य विभागा येथे कामकाज करण्याची तयारी दर्शविली होती व त्याप्रमाणे ते दि.०८/०६/२०१८ पासून कार्यरत आहेत. आरोग्य सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याकारणाने सदर अधिकारी व कर्मचारी वर्गास एक दिवसांचा तांत्रिक खंड देवून मागील कालावधी पासून म्हणजेच दि.०८/०६/२०१८ पासून पूर्वलक्षी प्रभावाने पुढील ६ महिन्याच्या कालावधी करीता वैद्यकीय आरोग्य विभागातील रुग्णालये, माता बाल संगोपन केंद्र, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व दवाखाने येथील वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गास कलम ५३(३) नुसार स्थायी समितीच्या पुर्व मंजूरीने सदर नेमणूका ६ महिन्यांच्या कंत्राटी पध्दतीने पुढे चालू ठेवणेस हरकत नसून ही सभा मंजुरी देत असून याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी<br>ठराव सर्वानुमते मंजूर |

| | | |
|---|---|---|
| ३७. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विजयनगर-तुळींज, नालासोपारा (पू) येथील रुग्णालयात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मानद तत्वावर सोनोलॉजीस्ट तज्ञ डॉक्टर नियुक्त करणेबाबतच्या प्राप्त अर्जावर निर्णय होणेबाबत. | ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विजयनगर-तुळींज, नालासोपारा (पू.) येथिल रुग्णालयात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मानद तत्वावर सोनोलॉजीस्ट तज्ञ नियुक्त करणेबाबतच्या प्राप्त अर्जावर निर्णय होणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महानगरपालिकेच्या विजयनगर-तुळींज रुग्णालयात मानद तत्वावर सोनोलॉजीस्ट तज्ञ डॉक्टर उपलब्ध केल्यास रुग्णांना फायदा होणार असल्याने या कामी डॉ.कार्तिकभाई सावलिया, एम.बी.बी.एस., एम.डी. (ऑब्स्ट ॲन्ड गायनॅक) यांना महानगरपालिका रुग्णालयात मानद तत्वावर सोनोलॉजीस्ट तज्ञ डॉक्टर म्हणुन नियुक्त करणेस तसेच महानगरपालिकेने निश्चित केलेनुसार दरमहा रु.२,५००/- इतके मानधन व त्यांनी केलेल्या कामाची होणारी फी मा. सर्वसाधारण सभा दि.१६/०२/२०१५ ठराव क्र.२६ व मा.महासभा दि.१६/०४/२०१५ ठराव क्र.२९ अन्वये निश्चित केलेल्या दरानुसार अदा करणेस ही सभा मंजुरी देत असुन याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ३८. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालयात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मानद तत्वावर स्त्रीरोग तज्ञ डॉक्टर नियुक्त करणेबाबतच्या प्राप्त अर्जावर निर्णय होणेबाबत. | ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालयात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मानद तत्वावर स्त्रीरोग तज्ञ डॉक्टर नियुक्त करणेबाबतच्या प्राप्त अर्जावर निर्णय होणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महानगरपालिकेच्या विजयनगर-तुळींज रुग्णालयात मानद तत्वावर स्त्रीरोग तज्ञ डॉक्टर उपलब्ध केल्यास रुग्णांना फायदा होणार असल्याने या कामी डॉ. सुमन यादव, एम.बी.बी.एस., एम.डी. डी.जी.ओ. यांना महानगरपालिका रुग्णालयात मानद तत्वावर स्त्रीरोग तज्ञ डॉक्टर म्हणुन नियुक्त करणेस तसेच महानगरपालिकेने निश्चित केलेनुसार दरमहा रु.२,५००/- इतके मानधन अदा करणेस ही सभा मंजुरी देत असुन याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ३९. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालयात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मानद तत्वावर कान-नाक-घसा तज्ञ डॉक्टर नियुक्त करणेबाबतच्या प्राप्त अर्जावर निर्णय होणेबाबत. | ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालयात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मानद तत्वावर कान-नाक-घसा तज्ञ डॉक्टर नियुक्त करणेबाबतच्या प्राप्त अर्जावर निर्णय होणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महानगरपालिकेच्या वसई रुग्णालयात मानद तत्वावर कान-नाक-घसा तज्ञ डॉक्टर उपलब्ध केल्यास रुग्णांना फायदा होणार असल्याने या कामी डॉ.धिरजकुमार नेमाडे, एम.बी.बी.एस., एम.एस. (इ.एन.टी)यांना महानगरपालिका रुग्णालयात मानद तत्वावर कान-नाक-घसा तज्ञ डॉक्टर म्हणुन नियुक्त करणेस तसेच महानगरपालिकेने निश्चित केलेनुसार दरमहा रु.२,५००/- इतके मानधन व त्यांनी केलेल्या कामाची होणारी फी मा.सर्वसाधारण सभा दि.११/०२/२०१४ ठराव क्र.१८ व मा.सर्वसाधारण सभा दि.१६/०२/२०१५ ठराव क्र.२६ अन्वये निश्चित केलेल्या दरानुसार अदा करणेस ही सभा मंजुरी देत असुन याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| ४० | <u>वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विजयनगर तुळींज रुग्णालयात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मानद तत्वावर न्युरोलॉजीस्ट तज्ञ डॉक्टर नियुक्त करणेबाबतच्या प्राप्त अर्जावर निर्णय होणेबाबत.</u> | ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या विजयनगर-तुळींज, नालासोपारा (पू) येथील रुग्णालयात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मानद तत्वावर न्युरोलॉजीस्ट तज्ञ डॉक्टर नियुक्त करणेबाबतच्या प्राप्त अर्जावर निर्णय होणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, महानगरपालिकेच्या विजयनगर-तुळींज रुग्णालयात मानद तत्वावर न्युरोलॉजीस्ट तज्ञ डॉक्टर उपलब्ध केल्यासल रूग्णांना फायदा होणार असल्याने याकामी डॉ. मोहिनीश भटजीवाले, एम.बी.बी.एस., एम.एस, एम.सीएच (न्यूरो सर्जन) यांना महानगरपालिका रुग्णालयात मानद तत्वावर न्युरोलॉजीस्ट तज्ञ डॉक्टर म्हणून नियुक्त करणेस तसेच महानगरपालिकेने निश्चित केलेनुसार दरमहा रु. २,५००/- इतके मानधन व त्यांनी केलेल्या कामाची होणारी फी मा.सर्वसाधारण सभा दि. ११/०२/२०१४ ठराव क्र. १८ व मा.महासभा दि. १६/०४/२०१५ ठराव क्र. २९ अन्वये निश्चित केलेल्या दरानुसार अदा करणेंस ही सभा मंजूरी देत असून याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ४१. | <u>वसई विरार शहर महानगरपालिका उसगाव/शिरवली २० द.ल.ली पाणी पुरवठा योजना अतंर्गत अंथरण्यात आलेली शिरसाड फाटा येथील मृद् पोलादी शुध्द पाण्याची जलवाहिनी बदलणे तसेच चंदनसार MBR येथील Valves बदलणे कामी प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.</u> | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमूद कामी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यास व पुढील निविदा कार्यवाही करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.किशोर पाटील सूचक :- मा.श्री. उमेश नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ४२. | <u>वसई विरार शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा सुर्या व उसगाव योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्रामधील क्लोरीनेशन यंत्रणेकरीता क्लोरीन गळती तपासक व शोषक (Chlorine gas leak detector & absorbption system) यंत्रणा बसविणे कामी प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.</u> | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यांस व पुढील निविदा कार्यवाही करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अजीत नाईक सूचक :- मा.श्री.उमेश नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ४३. | <u>वसई विरार शहर महानगरपालिकेस सन २०१७-१८,२०१८-१९,२०१९-२० या वित्तीय वर्षात सार्वजनिक कार्यक्रम, शालेय क्रिडा महोत्सव, गणेशोत्सव, महानगरपालिका सभा तसेच इतर कार्यक्रमासाठी आवश्यकतेनुसार चहापान,अल्पोपहार,भोजन,पुष्पगुच्छ, फुलांचे</u> | ठराव :- सदर प्रस्तावार सविस्तर चर्चा करण्यांत आली. सदर प्रस्तावावर निविदा समिती पुढे दि. १३/११/२०१७ रोजी द्वितीय वाटाघाटी करण्यांत आल्या आहेत. प्राप्त झालेले दर योग्य व वाजवी असून त्यानुसार महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७३ (क) अन्वये दि. १३/११/२०१७ रोजी झालेल्या द्वितीय वाटाघाटीद्वारे प्राप्त त्रैवार्षिक दर मंजूरीस तसेच महापालिकेच्या पॅनलवर १) मे. सेवालाल इंटरप्रायजेस २) मे. शार्वी कॅटरर्स ३) मे. शुभम मंडप डेकोरेटर्स ॲन्ड कॅटरर्स सर्व्हिसेस यांना मार्च २०२० अखेरपर्यंत नेमण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्री. वैभव पाटील** |

| | | |
|---|---|---|
| | हार इत्यादी व्यवस्था करणेकामी पात्र ई निविदाकारांबरोबर द्वितीय वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर मंजुरी बाबत. | **ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ४४. | वसई विरार शहर महानगरपालिकेस सन २०१७-१८,२०१८-१९,२०१९-२० या वित्तीय वर्षात सार्वजनिक कार्यक्रम, शालेय कला-क्रिडा महोत्सव, गणेशोत्सव,महिला मेळावे व इतर कार्यक्रमासाठी स्टेज मंडप, टेबल,पंखे, खुर्च्या, पडदे, साऊंड सिस्टीम, व्हिडीओग्राफी, फोटोग्राफी इत्यादी व्यवस्था भाडयाने पुरविणे कामी पात्र ई निविदाकारांबरोबर द्वितीय वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर मंजुरी बाबत. | ठराव :- सदर प्रस्तावार सविस्तर चर्चा करण्यांत आली. सदर प्रस्तावावर निविदा समिती पुढे दि. ०५/१०/२०१७ रोजी द्वितीय वाटाघाटी करण्यांत आल्या आहेत. प्राप्त झालेले दर योग्य व वाजवी असून त्यानुसार महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७३ (क) अन्वये दि. ०५/१०/२०१७ रोजी झालेल्या द्वितीय वाटाघाटीद्वारे प्राप्त त्रैवार्षिक दर मंजूरीस तसेच महापालिकेच्या पॅनलवर १) मे. श्री. गजानन मंडप डेकोरेटर्स२) मे. सिराज डेकोरेटर्स ३) मे. आर्यन इलेक्ट्रीकल्स ४) मे. प्रिती इंटरप्रायजेस ५) मे. सत्यम डेकोरेटर्स ६) मे. शुभम मंडप डेकोरेटर्स ॲन्ड कॅटरर्स सर्व्हिसेस ७) मे.राजकुमार इलेक्ट्रीकल्स यांना मार्च २०२० अखेरपर्यंत नेमण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. अजीत नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ४५. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या चतुर्थश्रेणी कर्मचारी वर्गाकरीता गणवेश, रेनकोट व गमबुटखरेदी करुन पुरवठा करणेबाबतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरीबाबत. | ठराव :- आस्थापनेवरील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना गणवेश, बुट, चप्पल, रेनकोट खरेदीकामी सविस्तर चर्चा करण्यांत आली. महापालिकेच्या आस्थापनेवरील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना गणवेश, बुट, चप्पल, रेनकोट इत्यादी देण्यात यावेत. तसेच याकामी येणाऱ्या रु. २४,३४,९१५/- इतक्या खर्चास व ई-निविदा दर मागविणेस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ४६. | सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील एनर्जी एफिशिएन्सी सर्विस लिमिटेड (EESL) माध्यमातुन ऐस्को (ESCO) तत्वावरील दिवाबत्ती व्यवस्था वगळुन उर्वरीत विद्युत व्यवस्था व कार्यालयीन देखभाल दुरुस्ती करिता विद्युत साहित्य खरेदी करणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन सन २०१८/१९ या वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ईईएसएलच्या माध्यमातुन एस्को तत्वावरील दिवाबत्ती व्यवस्था वगळून उर्वरीत विद्युत व्यवस्था व कार्यालयातील विद्युत व्यवस्था देखभाल दुरुस्तीकरीता विद्युत साहित्य खरेदी करणेकामी ई-निविदा मागविणेंत यावी. एनर्जी एफिशिएन्सी सर्विस लिमिटेड (EESL) द्वारे एल.ई.डी. (LED)दिवे बसविणेची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सन २०१६-१७ या वित्तीय वर्षातील दिवाबत्ती साहित्य पुरवठा मंजूर निविदा धारकास मुदतवाढ देण्यांत येत आहे. याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. उमेश नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ४७. | प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील वॉर्ड क्र.४६ मधील पाच आंबा मुख्य रस्ता ते महेशपार्क गार्डन ते तुळींज मुख्य रस्त्यापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामी आर्थिक व | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक बाधक चर्चा करण्यात आली. त्यानुसार सदर काम करणेस व सदर कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम रु.३२७१५१६/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे सदर कामी विहीत प्रणालीनुसार निविदा मागविणेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या रु.३२७१५१६/- खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी** |

| | | |
|---|---|---|
| | प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत कामाला प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ४८. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात डिजीटल वॉल पेन्टींग (LEBC) द्वारे जनजागृती करणे. (बी-२ निविदा) या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त निविदांची तूलना करता मे.केन इमेज मिडीया टेक हयांची निविदा रु.६५ प्रती स्क्वे. फूट दराने सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये हया कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देणेकरीता मा.आयुक्त हयांनी मा.स्थायी समिती कडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार संविदा करणेस हि सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. अजीत नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ४९. | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दि. १६/०४/२०१८ ते दि. २४/०६/२०१८ या कालावधीत लागलेल्या आगी व झालेल्या दुर्घनांचे प्रतिवृत्त माहितीसाठी स्थायी समितीस सादर. | ठराव :- प्रस्तावात नमुद केलेनुसार उक्त कालावधीत लागलेल्या आगी व झालेल्या दुर्घटनेचे प्रतिवृत्त जे माहितीसाठी सभेस दिलेले आहे, त्याचे सभेने अवलोकन केले व त्यास ही सभा एकमताने मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. विद्या पाटील सूचक :- मा.श्री. किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

नगरसचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका